Publication: Punyanagari
Date: 21/4/2019
Page: 4
Column: 6-7

पुण्य नगरी
रविवार
२१ एप्रिल २०१९

# अदानीचा अग्निसुरक्षा सप्ताह साजरा

। मुंबई : अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडच्या माध्यमातून अग्निशमन दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत १४ ते २० एप्रिल २०१९ या काळात अग्निसुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहादरम्यान ७००० हून अधिक कर्मचारी आणि ग्राहकांसोबत संवाद साधण्यात आला.

१४ एप्रिलपासून सुरू झालेल्या या सप्ताहामध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करत अदानी वीज समूहाच्या सर्व कार्यालयांमध्ये कर्मचाऱ्यांना आगीच्या धोक्यासंदर्भात माहिती करून देण्यासाठी तसेच घरात आणि व्यावसायिक जागेत अशा घटना टाळण्यासाठी जनजागृती कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. याबाबत एईएमएलच्या प्रवक्त्यांनी सुरक्षा हे मूळ ध्येय असल्याचे सांगत अग्निसुरक्षेसाठी अग्निशमन दलाचे सहकार्य लाभणे हा आमचा सन्मान असल्याचे सांगण्यात आले. मुंबई बंदरात १४ एप्रिल रोजी एसएस पोर्ट स्टिकीन या जहाजावरील आग शमवताना मृत्युमुखी पडलेल्या जवानांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी अग्निसुरक्षा सप्ताह पाळला जातो. या सप्ताहादरम्यान आपत्कालीन स्थितीत कोणत्या सुरक्षा उपायांचा वापर करावा, जनजागृती करणे, हे एक जबाबदार नागरिक म्हणून कर्तव्य असल्याचे स्पष्ट केले.

या मोहिमेचा भाग म्हणून आठवडाभर चालणाऱ्या कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच, आग लागल्यास काय काळजी घ्यावी, याबाबत मार्गदर्शनासाठी एईएमएलने या क्षेत्रातील तज्ज्ञांना आमंत्रित केले होते.